महाराष्ट्र शासन
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
## DIRECTORATE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH
Govt.Dental College & Hospital Building, St.George's Hospital Compound, Mumbai - 400 001.
Tel.No. +91-22-22620361-65/22652257/59 Telegram:" MEDUCATNSEARCH"
Fax:+91-22-22620562/22652168 Website :http://www.dmer.org

परिपत्रक / अतितात्काळ
क्र.संवैशिवसं/एनआरएचएम/प्रवनबा-निशुल्कसेवा/४-अ, दिनांक : ३०/०५/२०११

प्रति,
अधिष्ठाता,
सर्व महाविद्यालय

विषय : प्रसुती व नवजात बालकांना निःशुल्क उपचार व मोफत संदर्भ सेवा पुरविणेबाबत.

संदर्भ : स्वास्थ एवं परिवार कल्याणमंत्री मा. श्री. गुलाम नबी आझाद , भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मा. मुख्यमंत्री महोदयांना अग्रेषित इंग्रजी पत्र क्र. D.O.Dy.No 376/2011-HFM, Dated 18 Feb.2011

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भीय पत्राची प्रत सोबत जोडली आहे. सदरपत्रात आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये गरोदर माता व नवजात बालकांना मोफत औषधोपचार देण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर सेवेमध्ये मोफत औषधोपचार, आहार व इतर अनुषंगीक सेवेचा समावेश आहे. शासकीय रुग्णालयात येणाऱ्या सर्व गरोदर स्त्रियांना (दारिद्रय रेषेखालील व त्या वरील) आवश्यक प्रसुतीपुर्व तपासण्या, औषधोपचार, बाळंतपणाच्या सुविधा, प्रसुतीपाश्चात सेवा पूर्णपणे मोफत उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. नवजात बालकांना ( जन्मानंतर २८ दिवसापर्यंत) रुग्णायलयात किंवा घरी जन्माला आल्यानंतर कोणत्याही कारणांस्तव रुग्णालयात भरती केल्यानंतर त्याना लागणारा औषधोपचार व सर्व वैद्यकीय सेवा मोफत उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

वरिल मोफत वैद्यकीय सेवेबाबत सविस्तर बाब केंद्र शासनाच्या संदर्भीय पत्रामध्ये नमुद केलेली आहे. सदर पत्रात नमुद बाबींचे काटेकोर पालन आपल्या रुग्णालायात तात्काळ करावेत व आपण केलेल्या कार्यवाहीची माहिती या संचालनालयास सादर करावी.

संचालक,
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.**

प्रत माहितीस्तव सविनय सादर :
१) मा. अतिरिक्त मुख्य सचिव, सर्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,मुंबई
३) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.

(2)

गुलाम नबी आजाद
GHULAM NABI AZAD

24183

स्वास्थ्य एवं परिवार कल्याण मंत्री
भारत सरकार
निर्माण भवन, नई दिल्ली-110108
Minister of Health & Family Welfare
Government of India
Nirman Bhavan, New Delhi-110108

D.O. Dy.No.376/2011-HFM

February 8, 2011.

My dear Mr. Prithviraj Chavan ji,

You may be aware that India, recognized as an emerging global power, accounts for the highest number of maternal and child deaths in the world. Around 68 thousand women die every year due to pregnancy related complications and around 18 lakh children die annually, out of which, over 10 lakh die within 28 days of their birth. Most of these deaths are preventable.

Under the National Rural Health Mission (NRHM), our focus is on reducing maternal and infant deaths. Many initiatives have been rolled out, which include direct cash assistance to pregnant women under Janani Suraksha Yojana (JSY) to encourage them to deliver in institutions rather than at home. Funds have been provided to the States for upgrading facilities by way of additional infrastructure, equipment, drugs & consumables, multi-skilled doctors and nurses etc. Support is also provided to the States for providing accessible and assured referral transport.

In the meeting of State Health Ministers in Hyderabad on 11-13 January, there was a consensus that, with augmented funding under NRHM, it is possible to guarantee deliveries in public health facilities free of any charges. No pregnant woman delivering in government institution need to make any kind of payment towards service fee, drugs, diet, consumables and other miscellaneous expenses. Moreover, she would be guaranteed free and assured referral transport from home to facility, between facilities, in case of referral, and drop back from facility to home.

It has also been decided to put in place a similar guarantee of free treatment and free referral transport for all sick new borns for the first 30 days of their life under NRHM.

I would urge you to instruct all concerned to ensure this and also widely publicize these initiatives, which would go a long way in reducing morbidity and mortality among mothers and neonates.

With regards,

Yours sincerely,

(Ghulam Nabi Azad)

Shri Prithviraj Chavan,
Hon'ble Chief Minister of Maharashtra,
Mantralaya,
Mumbai – 400 032.

महाराष्ट्र शासन

# राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

राज्य आरोग्य सोसायटी, सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र

विकास खारगे भा.प्र.से.
आयुक्त (कुटुंब कल्याण) व
अभियान संचालक (राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान)
दूरध्वनी : ०२२-२२६२०२३५
फॅक्स : ०२२-२२६४२९५५
E-mail : mdnrhm.mumbai@gmail.com

NRHM
महाराष्ट्र शासन

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार,
पी.डिमेलो रोड, मुंबई-४०० ००१.
www.maha-arogya.gov.in

जा.क्र.राआसोम/जशिसुका/ ४३३१० /११
दिनांक २१ नोव्हेंबर २०११

विषय :- जननी-शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत (JSSK) माता व नवजात अर्भकांना वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात संपूर्ण मोफत सेवा पुरविण्याबाबत.

संदर्भ :- १) संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे आपणांस अग्रेपित केलेले पत्र क्र. संवैशिवसं/ एनआरएचएम /प्रवनबा निशुल्कसेवा/ ४ब, दि.३०/५/२०११.

प्रिय, डॉ बोभाटे,

माता-मृत्यूदर व अर्भक मृत्यूदर कमी करणे हे आर.सी.एच.कार्यक्रमाचे महत्वाचे उद्‌दिष्ट आहे. यासाठी प्रसुतीपूर्व, प्रसूती दरम्यान व प्रसूती पश्चात मोफत सेवा देणे, तसेच नवजात अर्भकाला जन्मल्यानंतर ३० दिवसापर्यंत आवश्यक त्या सर्व सेवा मोफत पुरविण्यात आल्यास निश्चितपणे माता-मृत्यूदर व अर्भक मृत्यूदर कमी करण्यास मदत होईल. यासाठी केंद्र शासनाने जननी-शिशु सुरक्षा कार्यक्रम (JSSK) हाती घेतला असून त्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्या अनुषंगाने संदर्भाधिन शासन निर्णयान्वये राज्यामध्ये दि. ७ ऑक्टोबर २०११ रोजी जननी-शिशु सुरक्षा कार्यक्रम (JSSK) सुरु करण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत माता व नवजात अर्भकांना सार्वजनिक आरोग्य संस्थामध्ये संपूर्ण मोफत सेवा पुरविण्यात येत आहेत.

संदर्भाधिन पत्र क्रमांक २ अन्वये संचालक, वैद्यकिय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांनी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार आपल्या रुग्णालयामध्ये येणाऱ्या माता व नवजात बालकांना मोफत औषधोपचार, आहार, सर्व गरोदर स्त्रियांना आवश्यक प्रसुतीपूर्व तपासण्या, बाळंतपणाच्या सुविधा, प्रसुतीपाश्चात सेवा इ. पुरविण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. संचालक (वैद्यकिय शिक्षण व संशोधन) यांच्या संदर्भाधिन पत्राची प्रत, तसेच केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची प्रत सोबत जोडली आहेत.

त्या अनुषंगाने कृपया आपल्या वैद्यकिय महाविद्यालयामध्ये बाळंतपणासाठी दाखल होणाऱ्या सर्व गरोदर माता व ३० दिवसापर्यंतची आजारी बालके यांना उपरोक्त मोफत सेवा देऊन केंद्र शासनाच्या सुचनांचे तंतोतत पालन करावे .

आपला स्नेहांकित,

o/c (विकास खारगे)

NRHM CELL
ISSUED
Date :22/11/11

प्रति,

डॉ. एस.के.बोभाटे,
अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय,
अकोला.